**नगर परीषद राज्य संवर्गातील पदभरतीसाठी ऑनलाईन संगणकीय काम करण्यासाठी निविदा.**

| | | |
|---|---|---|
| १ | निवीदा प्रपत्र मिळण्याच्या कालावधी व ठिकाण | निविदा फॉर्म www.washim.nic.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेता येतील. |
| २ | निविदा प्रपत्र भरुन देण्याची अंतिम मुदत | दि.१३ डिसेंबर,२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यत |
| ३ | निविदा प्रपत्र भरुन देण्याचे ठिकाण | नगर विकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम |
| ४ | निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व स्थळ (तांत्रिक लिफाफा-१ सर्व निविदाधारकांच्या उपस्थितीत उघडला लाईल. तांत्रिक लिफाफा-१ ची पूर्तता झ ालयानंतरच तांत्रिक लिफाफा-२ उघडण्यात येईल.) | दि. १३ डिसेंबर, २०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता. |
| ५ | इसारा रक्कम | रु. ५,०००/- निविदे सोबत धनाकर्ष जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, वाशिम यांचे नावे काढावा. |
| ६ | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, वाशिम हे कोणतीही एक अथवा सर्व निविदा किंवा निविदेची संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा निविदेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार राहून ठेवत आहेत. | |

अध्यक्ष जिल्हा निवड समिती,
तथा जिल्हाधिकारी,वाशिम

## अटी व शर्ती

१. मोहोरबंद लिफाफयावर पदभरतीची ऑनलाईन संगणकीय काम करण्यासाठी निविदा असे लिहीणे आवश्यक आहे. या लिफाफयामध्ये तांत्रिक व अतांत्रिक असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे तसा उल्लेखासह असावेत.
२. निविदाधारकाने इसारा रक्कम म्हणून रुपये ५०००/- जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, वाशिम यांच्या नावाने भारतीय स्टेट बॅक, शाखा वाशिम येथील बॅकेत वटणारा राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष (डि.डि.) तांत्रिक निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.
३. निविदा फॉर्म www.washim.nic.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करून घेता येईल.
४. निविदा प्रपत्र भरुन सादर करण्याचे ठिकाण :- नगर विकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे दि १३ डिसेंबर, २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत निविदा फॉर्म जमा करावेत. त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.
५. प्राप्त निविदा दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो.
६. निविदा सोबतच्या विहित नमून्यामध्ये निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर करावी.

अध्यक्ष जिल्हा निवड समिती,
तथा जिल्हाधिकारी,वाशिम

# जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

## नगर परीषद राज्य संवर्गातील पदभरतीसाठी ऑनलाईन संगणकीय काम करण्यासाठी निविदा

### तांत्रिक निविदा-१
### (फॉर्म-अ)

निविदा अनुक्रमांक :- ०१/२०१६ (तांत्रिक- फॉर्म-अ)
जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

नगर परीषद राज्य संवर्गातील श्रेणी क-१ व क-२ प्रवर्गातील अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य,विद्युत/संगणक/मलनिस्सारण व स्वच्छता), लेखा व लेखापरीक्षण सेवा श्रेणी क, नगर रचना व विकास सेवा श्रेणी क,कर निर्धारक व प्रशासकीय सेवा (श्रेणी क - १ व क - २) पदभरतीसाठी ऑनलाईन संगणकीय काम करण्यासाठी जाहिरात प्रसिध्दिद्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

### तांत्रिक निविदा (फॉर्म-अ)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निविदाधारकाचे / संस्थेचे नांव | :- | |
| २. | संपूर्ण पत्ता- | :- | |
| ३. | दुरध्वनी क्रं. (कार्यालय) | :- | |
| | फॅक्स क्रं. (कार्यालय) | :- | |
| | ई-मेल | :- | |
| ४ | इसारा रक्कम रुपये ५०००/- | :- | डिमांड ड्राफ्ट क्रं. --------------- व दि. ------------<br>बॅकेचे नांव व शाखा |
| ५ | निविदा प्रपत्र भरुन देण्याचा अतिम दिनांक व ठिकाण | :- | दि. १३ डिसेंबर, २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत नगर विकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम |
| ६ | व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध नोंदण्या. | | |
| | अ) कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, प्रमाणपत्राचा नोंदणी क्रं. व वैधतेची मुदत | :- | प्रमाणपत्र देणारे कार्यालय --------------------------<br>--------------------------------<br>-------------------------------- |
| | ब) दुकाने व संस्था अधिनियम १९४८ प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक व वैधतेची मुदत | :- | प्रमाणपत्र देणारे कार्यालय------------<br>-------------------------------<br>------------------------------- |
| ७ | आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) | :- | ------------------------------- |

(टिप :- तांत्रिक निविदा (फॉर्म-अ) मधील अ.क्र. १ ते ७ मधील सर्व माहिती भरणे आवययक आहे. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.)

दिनांक :-
ठिकाण :-

**निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

अतांत्रिक निविदा-१
(फॉर्म-ब)

नगर परीषद राज्य संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत पुरवठादारांनी खालीलप्रमाणे प्रती अर्ज दर नमुद करावेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | इंटरनेटच्या माध्यमातून आलेले प्रती अर्ज | | |
| २ | उत्तर पत्रिकेची छपाई करुन परिक्षाकेद्र व वर्गनिहाय बंद पॉकीट पुरविणे (प्रति उत्तर पत्रिका) | | |
| ३ | उत्तर पत्रिकेची स्कॅनीग करणे (प्रति उत्तर पत्रिका) | | |

**निविदेच्या इतर अटी व शर्ती :-**

१. निविदा फॉर्म www.washim.nic.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेता येईल.
२. अनामत रक्कम रुपये ५०००/- चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डि.डि. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, वाशिम यांचे नावे काढून लिफाफा क्रं. १ मध्ये जोणे आवश्यक आहे.
३. निविदा धारकानी दर सर्व करासह नमूद करणे आवश्यक आहे.
४. निविदा धारकाकडे OMR पध्दतीने तपासण्यासाठी स्कॅनर, प्रिंटर, संगणक व इतर आवश्यक तांत्रिक यंत्रसामुग्री असणे आवश्यक आहे.
५. निविदा धारकाकडे अंतिरक्त मनुष्यबळ व अत्याधुनिक यंत्रसामुग्री असणे आवश्यक आहे. सदर online चे कामासाठी इंटरनेटची सुविधा असणे आवश्यक आहे.
६. सदर निविदाचे काम गोपनियरित्या व विहित कालावधीनुसार पार पाडणे आवश्यक असून त्याचा भंग झाल्यास तो संबंधित संस्था/कंपनी/व्यक्ती यांच्या विरुध्द चा दखलपात्र गुन्हा समजला जाईल व कायदेशीर कार्यवाही केली जाईल.
७. तांत्रिक व दरासंबंधीत लिफाफ्याचे मुल्यमापन मा. जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली निविदा समिती जिल्हाधिकारी कार्यालय करेल व त्या संबंधीचा अंतीम निर्णय मा. जिल्हाधिकारी यांचा राहिल.
८. कोणतीही निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा किंवा कोणत्याही टप्यावर निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी वाशिम यांचेकडे असेल.
९. निविदा दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. जिल्हाधिकारी वाशिम यांचे कक्षात उघडण्यात येईल.
१०. यशस्वी निविदा धारकास १००/- रुपये च्या मुद्रांक पत्रावर करारनामा करुन द्यावा लागेल.
११. यशस्वी निविदा धारकास उमेदवाराचे online अर्जा संबंधी संकलीत माहिती दररोज जिल्हाधिकारी कार्यालयास (नगर विकास शाखा) सादर करावी लागेल.
१२. उमेदवाराची online माहिती करप्ट न होणे, व्हायरसमुळे नष्ट न होणे, यासाठी यशस्वी निविदा धारकास सुरक्षिततेचे उपाय स्वत: करावे लागतील. तांत्रिक सदोषामुळे माहिती नष्ट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकावर असेल.
१३. काम पुर्ण होण्याअगोदर कोणत्याही प्रकारचे अग्रीम / अनामत रक्कम देण्यात येणार नाही.
१४. असमाधानकारक काम, मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीची कमतरता, सेवेमध्ये अनियमितता आढळल्यास अंतीम देयकातून दंडनीय रक्कम कपात करण्यात येईल.
१५. उमेदवाराकडून online अर्ज इंटरनेटवर भरुन घेणे.
१६. दिलेल्या निकषानुसार पात्र, अपात्र उमेदवारांची यादी तयार करुन प्रसिध्द करणे.
१७. संगणकीकृत प्रवेशपत्र उमेदवारांना online पुरविणे.

१८. उमेदवाराचे परिक्षेचे हजेरीपट तयार करणे, हजेरीपट तयार करतांना रुम / व्हॉलनिहाय उमेदवाराची यादी तयार करुन देणे.

१९. सदर पदासाठी OMR शिट ची छपाई करणे.

२०. OMR शिट उत्तरपत्रिकेची स्कॅनिंग करणे.

२१. उमेदवाराचा निकाल तयार करणे.

२२. उमेदवाराचे पदनिहाय व प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करणे. (सामाजिक / समांतर आरक्षणासह)

२३. पदनिहाय व प्रवर्गनिहाय उमेदवाराची निवड यादी व प्रतिक्षायादी तयार करणे.

२४. पदभरतीचे अनुषंगाने इतर कामे करणे.

२५. सदर पदभरतीकरीता अंदाजे ५००० उमेदवारांचे अर्ज येऊ शकतील. सबब लेखी परिक्षेचा निकाल त्याच दिवशी प्रसिध्द करावयाचा असल्यामुळे, परिक्षेच्या दिवशी निकाल तयार करुन देणे निविदाधारकास बंधनकारक राहिल. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचेकडे अद्यावत यंत्रसामुग्री व मनुषबळ उपलब्ध आहे अश्याच व्यक्तीनी/संस्थेने सदर निविदा भरावी.

अध्यक्ष जिल्हा निवड समिती,
तथा जिल्हाधिकारी,वाशिम

**बंद लिफाफा क्रं.-१ (तांत्रिक) फॉर्म-अ मध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत.**

१. प्रत्येक निविदाधारकास इसारा रक्कम रुपये ५०००/- राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, वाशिम यांच्या नावे काढून निविदेसोबत जोडावा लागेल.
२. आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत.
३. निविदेच्या अंतीम तारखेपर्यत ग्राहय असलेले आयकर भरल्यासंबंधीचे प्रमाणपत्राची प्रत व पॅनकार्ड प्रत सोबत जोडावे लागेल.
४. वार्षिक उलाढाल कमीम कमी रुपये १५ लक्ष असल्याबाबतचे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडावे लागेल.
५. कामाचे अनुभव प्रमाणपत्र (एका वेळोस कमीत कमी १५००० अर्जाचे संगणकीय काम केल्याचे प्रमाणपत्र) व पुरावे.
६. यंत्र सामुग्री व मनुष्यबळाचे विवरण
७. गोपनियता पालनतेचे विहित प्रपत्रातील हमीपत्र.
८. निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे स्वाक्षरीसह प्रमाणपत्र

**बंद लिफाफा क्रं-२ (अतांत्रिक) मध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत.**

१. निविदाधारकास सोबतच्या विहित नमुना फॉर्ममध्ये निविदा सादर करावी लागेल.
२. निविदेत नमूद केलेले दर हे सर्व करांसहित नमूद केलेले असावेत.
३. निविदा फॉर्मवर निविदाधारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

अध्यक्ष जिल्हा निवड समिती,
तथा जिल्हाधिकारी,वाशिम